# मिरा भाईंदर महानगरपालिका

## माहिती व जनसंपर्क विभाग

## प्रेसनोट

- **प्लास्टिक वापर व अस्वच्छता पसरविणाऱ्या विरोधात दंडात्मक कारवाईचे सत्र सुरूच**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक श्री. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या निर्देशानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाने एकल प्लास्टिक वापर व अस्वच्छता पसरविणाऱ्या विरोधात दंडात्मक कारवाईचे सत्र सुरूच ठेवले आहे. मागच्या काही दिवसात मनपाच्या स्वच्छता अधिकारी व त्यांच्या पथकाने 6 लाख दंड वसुली केली होती. आज दि.२६/१२/२०२४ रोजी मा. अति. आयुक्त श्री. अनिकेत मानोरकर, मा. उप-आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन), सहाय्यक आयुक्त, उप स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, सहाय्यक स्वच्छता निरीक्षक व पथक यांनी प्रभाग समिती क्र.०१ व ०२ मधील भाईंदर प. विभागात दंडात्मक कारवाई केली. एकल प्लास्टिक पिशवी वापरणा-यांकडून २५०००/- रक्कम वसुल करून ११ किलोग्रॅम एकल प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे. तसेच मिरा भाईंदर शहरातील रस्त्यांवर व पदपथांवर अस्वच्छता पसरवणारे व कचरा डब्बा न ठेवणा-यांवर देखील ३०००/- रू. इतकी दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली. या दंडात्मक कारवाईत एकूण रक्कम २८०००/- वसूल करण्यात आले आहे.

एकल प्लास्टिक वापर बंदी कारवाई, सार्वजनिक ठिकाणी तसेच रस्त्यांवर थुंकणे, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकून अस्वच्छता करणाऱ्या विरोधात घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत अशीच कारवाई यापुढे हि चालू राहणार आहे. म्हणूनच शहरातील नागरिक, फेरीवाले व दुकानदार यांनी स्वच्छतेचे गांभीर्य ओळखून मिरा भाईंदर शहर स्वच्छ ठेवण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.